# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०७९८/२२/अ.क्र.४१८५/२५/०१**

**श्री. रविकांत स. दुखंडे**
३४/२४३ एम.एम.बी. कॉलनी,
मजासवाडी (इ.डब्ल्यू.एस.),
सर्वोदय नगर, जोगेश्वरी (पूर्व),
मुंबई-४०००६०

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-२) के/पूर्व**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता के/पूर्व**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-२) के/पूर्व विभाग, श्री. प्रसाद धुमाळे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग यांचे प्रतिनिधी सहाय्यक अभियंता (परि-२) के/पूर्व विभाग, श्री. प्रसाद धुमाळे उपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. रविकांत दुखंडे यांनी दाखल केलेल्या दि.१०.०६.२०२० रोजीच्या जोडपत्र-अ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त के पूर्व यांच्या कार्यालयांनी मुख्य अधिकारी मुंबई झोपडपट्टी सुधारणा मंडळ मुंबई यांना दि.०६.०८.२०२१ रोजी निर्गमित केलेल्या पत्राची छायांकित प्रत जोडली असून या पत्राची (पत्र क्रमांक ७८३) सुस्पष्ट प्रत प्रमाणित करून मिळावी, अशी मागणी केलेली आहे. त्यावर तत्कालीन जन

माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-२) के/पूर्व विभाग यांनी सद्यस्थितीत माहिती उपलब्ध नसल्याचा प्रतिसाद दिला असून, त्याविरुद्ध दाखल केलेल्या दि.२६.०३.२०२१ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग यांनी माहिती अधिकार अर्जामध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांचा कार्यालयीन अभिलेखात शोध घेऊन सदर कागदपत्रे उपलब्ध असल्यास अपीलकर्त्यांना १५ दिवसात विनामूल्य पोस्टाने पाठवून द्यावी अन्यथा माहिती उपलब्ध नसल्याचा स्पष्ट प्रतिसाद द्यावा असे नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे दि.२३.०६.२०२१ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-२) के/पूर्व विभाग यांनी त्यांच्या उत्तरात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग यांच्या आदेशानुसार पुनश्च अभिलेखाचा शोध घेण्यात आला परंतु अपिलार्थी यांना हव्या असलेल्या माहिती संदर्भात कुठलेही दस्ताऐवज कार्यालयाच्या अभिलेखात आढळून आलेले नाही, असे नमूद केलेले आहे. यावर अपिलार्थी श्री. दुखंडे यांनी दि.२०.०८.२०२१ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून यात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग यांच्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे तसेच तीच जुनी माहिती पुनश्च एकदा प्रदान करण्यात आली असल्याचा आक्षेप नोंदणीत संबंधित पत्राचे सुस्पष्ट प्रत पुनश्च मिळण्याबाबत निर्देश केलेले आहेत.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-अ व ब ज्या कालावधीत दाखल झाला तेव्हा कोविड-१९ कालावधी असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-२) के/पूर्व विभाग यांनी पुनश्च एकदा अभिलेखात तसेच संगणकीय प्रणालीवर वृत्तपत्राबाबत पुनश्च एकदा शोध घेऊन पत्राची प्रत अभिलेखात उपलब्ध असल्यास ती साक्षांकित करून अपिलार्थीस प्रदान करावी अन्यथा माहिती उपलब्ध नसल्याबाबत माहिती निरंक असल्याबाबत सुस्पष्ट प्रतिसाद द्यावा.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

State Information Commission
Maharashtra